# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक १८ मार्च, २०१५

## (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजता)

**शासकीय विधेयके :-**

**(१) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१५.

**(२) विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे :-**

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अबू आजमी, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१४ नापसंत करते."

(ख) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५.

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------

**(३) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) (क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अबू आजमी, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २०१५ नापसंत करते."

(ख) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०१५.

---

(२) (क) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०१५.

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : शोक प्रस्ताव -**

श्री.नंदकुमार दामोदर काळे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये विधी व न्याय विभागाची सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वित्त आणि नियोजन मंत्री** : "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, २०११ च्या खंड ७ अन्वये वार्षिक योजना २०१५-१६ मधील प्रदेशनिहाय नियतव्ययाच्या वाटपाबाबतचे मा.राज्यपाल यांचे दिनांक १० मार्च, २०१५ रोजीचे निदेश" सभागृहासमोर ठेवतील.

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री हसन मुश्रीफ, चंद्रदीप नरके, राजेश क्षिरसागर, डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पब्लिक ट्रस्ट कायदा ४१ अ अन्वये राज्यामधील नोंदणी झालेल्या धर्मादाय रुग्णालयांमध्ये १०% गरीब रुग्णांवर मोफत उपचार करणे बंधनकारक असणे, विशेषतः मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटल, लिलावती, जसलोक, ब्रिचकॅन्डी, हिरानंदाणी, कोकीलाबेन, अंबानी, रहेजा, नानावटी, सैफी, गुरुनानक हॉस्पिटल तसेच पुणे येथील जहाँगीर रुग्णालय, लता मंगेशकर रुग्णालय, रुबी हॉल या रुग्णालयांनी शासनाकडून अनेक सवलती घेतलेल्या असणे, मा.उच्च न्यायालयाने आदेश देऊनही सदर रुग्णालये गरीब रुग्णांना नियमाप्रमाणे मोफत औषधोपचार करीत नसणे, त्यामुळे गरीब रुग्णांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, अतिरिक्त आयुक्त (धर्मादाय) यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेल्या आराखड्याच्या आदेशाप्रमाणे देखरेख समिती नियुक्त केलेली असणे, सदर समितीने तक्रारी करुन सुध्दा रुग्णालयांच्याविरुध्द कोणतीच कारवाई न करणे, त्यामुळे गोरगरीब रुग्णांमध्ये व त्यांच्या नातेवाईकात पसरलेला तीव्र असंतोष, या रुग्णालयांविरुध्द चौकशी करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.प्रशांत बंब, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मौजे चितेगाव, ता.पैठण, जि.औरंगाबाद येथील गट नं.६१ क्षेत्र ८ हे. ६७ आर. (२१ एकर २७ गुंठे) या जमिनीवर गत २१ वर्षापासून बाबा भांड व त्यांच्या कुटुंबियांची मालकी ताबा व वहिती असणे, परंतु तत्कालिन तलाठी यांने वादी सय्यद हबीबचा अर्ज स्वतःच लिहून, त्यावर स्वतः सय्यद अशी सही करणे व गट ६१ मौ.चितेगाव या जमिनीवर सय्यद हबीब व इतरांचा सन २०११-१२ मध्ये ताबा असल्याचा बनावट पंचनामा तयार करणे, तशाच प्रकारचा अहवाल तत्कालिन तहसीलदार, पैठण यांचेकडे दाखल करणे, तत्कालिन तहसिलदार यांची बदली आष्टी, जि.बीड येथे झाल्यानंतरसुध्दा सदर संचिका बरोबर घेऊन जाणे, तलाठी यांनी तयार केलेले बनावट कागदपत्र व पंचनाम्याच्या आधारे कार्यालयाबाहेरील संगणकावर निर्णय टंकलिखित करणे, संबंधित मालकीहक्काची रक्कम भरुन न घेता, त्याचदिवशी कुळाचे प्रमाणपत्र देणे, त्याचवेळी तलाठ्यास, ७/१२ च्या उताऱ्यावर सय्यदचे नावे नोंदविण्याचे आदेश देणे, दुय्यम निबंधक, पैठण यांनी ५ एकर जमिनीची रजिस्ट्री कुळाच्या नावे नोंदविण्याचे पत्र देणे, तत्कालिन तलाठी व तत्कालिन तहसिलदार यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, पैठण येथे भा.दं.वि.कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ व ३४ खाली एफ.आय.आर.आय-८१/२०१४ दिनांक ३१ मे, २०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात येणे, हस्ताक्षर तज्ञांनी दिलेल्या अहवालानुसार सय्यद हबीब यांचा अर्ज, ताबा पंचनामा, पैसे भरल्याचे चलान, इत्यादी कागदपत्र बनावट असणे, तत्कालिन तहसिलदार यांचेविरुध्द यापूर्वीसुध्दा पोलीस स्टेशन, वैजापूर येथे राजू इंगळे या गरीब शेतकऱ्याने भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१ व ३४ खाली एफ.आय.आर-१०/२०१३ दिनांक ५ मे, २०१३ रोजी फौजदारी गुन्हा दाखल असणे, तत्कालिन तहसिलदार व तत्कालिन तलाठी यांनी संगनमताने मौजे चितेगाव सजातील पाच गावात गतवर्षी ७७२ जमिनींचे फेरफार मंजूर करणे, त्यातील ५६९ फेर नियमबाह्य असणे, त्यापैकी २०२ फेरफार तत्कालिन तलाठ्यानी स्वतःच लिहून मंजूरी देणे, तरीही तत्कालिन तहसिलदार व तत्कालिन तलाठी यांचेविरुध्द बनावट कागदपत्रे तयार केल्याबद्दल शासनाकडून कोणतीही कारवाई न होणे, शासनाने या दोघांना तातडीने बडतर्फ करुन मालमत्तेवर टाच आणुन एका निश्चित कालमर्यादेत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी पूर्ण करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री तुकाराम काते, प्रकाश सुर्वे, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, सरदार तारासिंह, संदिप नाईक, बसवराज पाटील, अजय चौधरी, सुरेश गोरे, वैभव नाईक, ज्ञानराज चौगुले, वसंत चव्हाण, डी. पी. सावंत, अमिन पटेल, गोपालदास अग्रवाल, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अनाथ, निराधार आणि गरजू, मंदबुध्दी बालकांच्या पालनपोषणासाठी शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या वितरणात अनियमितपणा व प्रत्येक मुलाच्या मागे देण्यात येणारे अनुदान अत्यंत तुटपुंजे असल्याचे तसेच सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात महिला व बालविकास विभागासाठी रुमपये ३,३७८.३८९ कोटींची तरतूद केलेली असताना केवळ १,५६९.६१० कोटी म्हणजे रुपये ४६.४६० टक्केच खर्च केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस येणे, अनुदानाअभावी मुंबईसह जिल्ह्यातील बहुतांश बालगृहे अडचणीत सापडणे, मुंबईतील मानखुर्द येथील मंदबुध्दी बालगृहाची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असून येथील मुलाच्या पालनपोषणासाठी प्रत्येक मुलामागे दरमहा रुपये ८५०/- इतके अनुदान देण्यात येत असून सदर अनुदानामध्ये मुलाच्या दैनंदिन गरजा, शिक्षण, आरोग्य, संस्थेचा कार्यालयीन खर्च आदिंकरिता खर्च करावा लागत असल्यामुळे संस्थाचालकांना उसनवारी करुन मुलांचे पालनपोषण करावे लागणे, त्याचप्रमाणे मानखुर्द डोंगरी, माटुंगा येथील चेंबूर चिल्ड्रन होम, नविन निरिक्षण गृह, डेविड ससून इंडस्ट्रियल स्कूल, माटुंगा येथील बालगृहातील मुलांच्या पालनपोषणाकरिता मुलांमागे दरमहा रुपये ६३०/- इतके तुटपुंजे अनुदान देण्यात येणे, या तुटपुंज्या अनुदानामुळे मुलाच्या पालनपोषणांमध्ये अनेक अडचणी येऊन कर्मचाऱ्यांनादेखील वेळेवर वेतन मिळत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष, राज्यात कार्यरत असलेल्या एक हजारांहून अधिक बालगृहातील ८० ते ९० हजार बालकांच्या परिपोषणासाठी वार्षिक सुमारे ७० कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद होणे अपेक्षित असतानाही शासनाकडून तरतूद न होणे, गत दोन-तीन महिन्यापासून बालगृहाला अनुदान मिळाले नसल्यामुळे संस्था चालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, अनुदानातील अनियमितता ही मुंबईपुरती मर्यादित नसुन ती इतर जिल्ह्यात असल्याचे देखील निदर्शनास येणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, अनाथ, निराधार आणि गरजु, मंदबुध्दी बालकांच्या पालनपोषणासाठी देण्यात येणाऱ्या अनुदान वाढ करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भुमिका."

## (दुपारी २.०० वाजता)

**सहा : वित्त मंत्री : सन २०१५ - २०१६ चा अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ मार्च, २०१५

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.